Estd: 1962
"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

विषय - शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ चे Annual Self Appraisal Report (ASAR) जमा करण्याबाबत.

संदर्भ - १. कार्यालयीन परिपत्रक क्रमांक आस्थापना/पीजी/५८६, दि. १९/०५/२०२५.
२. कार्यालयीन परिपत्रक क्रमांक एसयु/आस्थापना/पीजी/७४०, दि. ०२/०६/२०२५.
३. कार्यालयीन परिपत्रक क्रमांक एसयु/आस्थापना/पीजी/७९३, दि. ११/०६/२०२५.
४. कार्यालयीन परिपत्रक क्रमांक एसयु/आस्थापना/पीजी/९४६, दि. २४/०६/२०२५
५. कार्यालयीन परिपत्रक क्रमांक एसयु/आस्थापना/पीजी/९८५, दि. ०१/०७/२०२५

या विभागाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकांव्दारे विविध अधिविभाग, प्रशाळा, केंद्र, अध्यासन येथील नियमित शिक्षकांना Online Portal वर Annual Self Appraisal Report (ASAR) भरण्याबाबत कळविण्यात आले होते. उपरोक्त संदर्भ क्र. ५ च्या परिपत्रकाव्दारे Online Portal वर Annual Self Appraisal Report (ASAR) ची माहिती अद्यावत करण्याची / भरण्यास दि. १०/०७/२०२५ पर्यत मुदतवाढ दिल्याबाबत परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते.

त्या अनुषंगाने आदेशावरुन कळविण्यात येते की, Online Portal वर Annual Self Appraisal Report (ASAR) ची माहिती अद्यावत / भरुन झाल्यावर त्याची Undertaking पर्यंत (जोडपत्रे वगळून) पाटपोट प्रिंट काढून तो विहित मार्गाने अधिविभागप्रमुख / संचालक यांच्या मार्फत दि. १०/०७/२०२५ पर्यंत आस्थापना पी.जी. विभागात सादर करावा.

तसेच शिक्षक समकक्ष पदावरील कार्यरत असणाऱ्या शिक्षकांचे ASAR अहवाल Online पध्दतीने भरण्यासाठी आवश्यक असणारे सॉफ्टवेअर तयार करण्याचे कामकाज संगणक केंद्राकडून सुरु असल्यामुळे त्यांनी सध्या सदर ASAR प्रचलित पध्दतीने पूर्वीप्रमाणे Hard Copy मध्ये दि. १०/०७/२०२५ पर्यंत आस्थापना पी.जी. विभागात सादर करावेत. तसेच त्यांचे सॉफ्टवेअर तयार झाल्यानंतर त्यांनी सदर ASAR Online पध्दतीनेही भरण्याची कार्यवाही करावी. जे शिक्षक विहित वेळेत ASAR सादर करणार नाहीत त्यांच्याबाबत शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

कुलसचिव

जा.क्र. एसयु/आस्थापना/पीजी/ 1030
दिनांक : 08 JUL 2025

प्रति,
अधिविभागप्रमुख / संचालक / समन्वयक,
सर्व अधिविभाग, स्कूल, केंद्र व अध्यासने,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

सदरचे परिपत्रक सर्व संबंधित शिक्षकांच्या व शिक्षक समकक्ष सेवकांच्या निदर्शनास आणावे. सर्वांची नावासह स्वाक्षरी घ्यावी व परिपत्रक निदर्शनास आणल्याबाबत या कार्यालयास कळवावे.